!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प १९२/०४/०३/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# रेल्वे विद्यापीठ संभाजीनगरलाच करण्याची मागणी

## रेल्वे अर्थसंकल्पाचा चर्चासत्रात रेल्वेमंत्र्याकडे लोकसभेत खासदार चंद्रकांत खैरे यांची आग्रही मागणी

**संभाजीनगर : ( ता. ११ )** आशिया खंडात सर्वात वेगाने वाढणारे शहर म्हणुन संभाजीनगरला ओळखले जाते. दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कोरीडोअर सारखे प्रकल्प शहरात होत असुन रेल्वेच्या मालकीच्या १० ते १२ एकर जमिनीवर रेल्वे विद्यापीठ संभाजीनगरलाच करण्याची मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांच्याकडे केली. या विद्यापीठासाठी आवश्यक पायाभुत सुविधा उपलब्ध असल्याने तसेच रेल्वेला आवश्यक मनुष्यबळ पुरवण्यास विद्यापीठ सक्षम ठरेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

दिवसेंदिवस रेल्वेचा वाढणारा विस्तार व तांत्रिक कामगाराची गरज लक्षात घेता रेल्वे मंत्रालयाने देशात विविध ठिकाणी रेल्वे विद्यापीठासाठी विशेष तरतुद केली आहे. यामुळे मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील तरुणांना व बेरोजगारांना आपोआप संधी मिळणार आहे.

रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांनी गेल्या आठवड्यातच रेल्वे अर्थसंकल्पात गुणवत्ता हा मुद्दा महत्वाचा असुन रेल्वेची संख्या न वाढता मनुष्यबळ व मुलभूत सोईसुविधा प्रवाशांना कशा मिळतील हाच उदेश रेल्वे विद्यापीठातील विद्यार्थी पूर्ण करतील. रेल्वेमंत्रालयांनी या महत्वपूर्ण विषयावर बोलण्याची संधी दिल्याबददल खासदार चंद्रकांत खैरे यांनी रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांचे आभार मानले.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400